Annexure- "I"

Maharashtra University of Health Sciences, Nashik
Physiotherapy Faculty
Information of Subject-wise Intake as per College &University Recognition, Permitted Seat-Matrix Chart Academic Year 2024- 2025

Name of College: HOUSABAI COLLEGE OF PHYSIOTHERAPY

UG Degree/PG Degree	Intake as per University /Council	
	Degree	Degree
UG Degree (B.P.Th. /BPT)	60	60
PG Degree	Intake as per University /Council	Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio
Musculoskeletal Physiotherapy	NA	NA
Neuro physiotherapy	NA	NA
Community Physiotherapy	NA	NA
Cardiovascular & Respiratory Physiotherapy	NA	NA
Sports Physiotherapy	NA	NA

Any Other, Please Specify (Any Increase /reductions in Seats allotted by University) : ....

Dr. Sukumar J. Magdum Foundation's Housabai College of Physiotherapy
S.J.M.F / H.C.O.P.T. 2024 Nimshirgaon

Principal Stamp & Signature

Principal
Housabai College of Physiotherapy
Nimshirgaon

Verified by The LIC Committee Members

______________ ______________ ______________ ______________

भौतिकोपचार महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत.

डॉ.सुकुमार जे.मगदूम फाऊंडेशन, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर संचलित हौसाबाई कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सांगली-कोल्हापूर हायवे, इचलकरंजी फाटा, धरमनगर जवळ, मु.पो.निमशिरगाव, ता.शिरुर, जि.कोल्हापूर

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: पीएसओ-२०२४/प्र.क्र.१८८/२४/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ९ ऑक्टोंबर, २०२४.

वाचा : १) शासन निर्णय, क्र.एमईडी-२०१७/प्र.क्र.२१०/१७/शिक्षण-१, दि.२६.१०.२०१७.
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-६/२९६३/२०२३, दि.२२.१२.२०२३.
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.DMER-११०१४/२०९/२०२४-CETIT, दि.१८.०७.२०२४.

प्रस्तावना:

डॉ.सुकुमार जे.मगदूम फाऊंडेशन, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर संचलित हौसाबाई कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सांगली-कोल्हापूर हायवे, इचलकरंजी फाटा, धरमनगर जवळ, मु.पो.निमशिरगाव, ता.शिरुर, जि.कोल्हापूर या संस्थेचा भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(२) च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची त्रुटींच्या अनुषंगाने शिफारस नाकारली होती. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम,१९९८ च्या कलम ६४ (५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारांनुसार संस्थेची सक्षमता तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेतील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला परवानगी देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील भौतिकोपचार अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन, डॉ.सुकुमार जे.मगदूम फाऊंडेशन, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर संचलित हौसाबाई कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सांगली-कोल्हापूर हायवे, इचलकरंजी फाटा, धरमनगर जवळ, मु.पो.निमशिरगाव,

S. J. M. Foundation
Jaysingpur.
Inword No - 08
Date- 10/10/2024
Magdum Foundation's Housabai College of Physio
S.J.M.F / H.C.O.P.T. 2024 Nimshirgaon

ता.शिरुर, जि.कोल्हापूर या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम (BPTh) सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदर महाविद्यालयातील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६० इतकी राहील.

२) सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

३) राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट, १९८८ चा क्र.६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरण्यात येणार नाहीत.

८) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस संलग्निकरण देण्यापूर्वी व विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

१०) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या शिफारशींच्या आधारे सदर परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई

Dr. Sukumar J. Magdum Foundation's Housabai College of Physiotherapy
S.J.M.F / H.C.O.P.T. 2024 Nimshirgaon

६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.

७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे(पू), मुंबई-४०००५१.

८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.

९. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई .

१०. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.

११. अध्यक्ष/सचिव, डॉ.सुकुमार जे.मगदूम फाऊंडेशन, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

१२. निवडनस्ती (शिक्षण-१).

Dr. Sukumar J. Magdum Foundation's Housabai College of Physiotherapy
S.J.M.F / H.C.O.P.T. 2024 Nimshirgaon

Principal
Housabai College of Physiotherapy
Nimshirgaon

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel (0253) 2539244/6659244/241/242 Student Helpline:0253-539111/6659111/100
Website www.muhs.ac.in, E-mail planning@muhs.ac.in
MUHS

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम बी बी एस, एम डी (न्यायवैद्यकशास्त्र), डी एन बी, एल एल बी
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M B B S, M D (Forensic Medicine), D N B, L L B
Registrar

No. MUHS / PB /UG / P-6/1895/2024

Date: 18/10/2024

To,

The President / Secretary,
Dr. Sukumar J. Magdum Foundation,
Jaisingpur, Tal. Shirol,
Dist. Kolhapur.
Mobile No. :- 9766653939 / 8623091525.
Email : shrij.hcp@gmail.com

Sub: Grant of First Time Affiliation for the Academic Year 2024 – 25.

Sir,

As per the provision of section 65 (4) of Maharashtra University of Health Sciences Act 1998, I am directed to inform you that, on the basis of the Local Inquiry Committee report and Circulatory Permission from Academic Council vide Resolution No. 209/2024 the Hon'ble Vice Chancellor is pleased to Grant First Time Affiliation to, **"Housabai College of Physiotharapy, Sangli-Kolhapur Highway, Ichalkaranji Phata, Near Dharamnagar, A/p. Nimshirgaon Tal. Shirur, Dist. - Kolhapur."** B.P.Th Course for the Academic Year **2024-25**. However, this affiliation is subject to the following conditions.

1) The intake capacity shall be **60** students for **B.P.Th Course.**
2) Rules and Regulations made by the Govt. and the University, as amended from time to time, will be binding on the College.
3) The college should obtain approval/recognition for teachers from Maharashtra University of Health Sciences, Nashik.
4) The College should obtain the permission for admitting the students from the Admission Regulating Authority, Mumbai.
5) The college should obtain approval of fee schedule for the admission of the students from the Fee Regulating Authority, Mumbai.

(P.T.O.)

Dr. Sukumar J. Magdum Foundation's Housabai College of Physiotherapy
S.J.M.F / H.C.O.P.T. 2024 Nimshirgaon

6) This First Time Affiliation is Valid for Academic year 2024-25 only.

7) The next batch of students shall not be admitted unless Continuation of Affiliation of MUHS, is obtained by college/Institute.

8) It is mandatory for the College / Institute to register on AISHE portal and submit the required data on AISHE portal time to time.

Yours,

18-10-24

Registrar

Copy to: -

1) The Secretary, Medical Education & Drugs Department, Mumbai
2) The Director, Directorate Medical Education & Research, Mumbai.
3) The Director, Maharashtra State Council for Occupational Therapy & Physiotherapy, Mumbai
4) The Commissionerate, CET Cell, 8th Floor, New Excelsior Building, A. K. Nayak Marg, Fort, Mumbai 400 001.
5) The Chairman, Admission Regulating Authority, 8th Floor, New Excelsior Building, A. K. Nayak Marg, Fort, Mumbai 400 001.
6) The Chairman, Fees Regulating Authority, 3rd Floor, 49, Kherwadi, Ali Yawar Jung Marg, Bandra (E), Mumbai – 400 051.
7) The P.S. to Hon'ble Vice Chancellor, MUHS, Nashik.
8) The P.S. to Pro Vice Chancellor, MUHS, Nashik
9) The Registrar, MUHS, Nashik.
10) The Controller of Examinations, MUHS, Nashik.
11) Finance and Accounts Officer, MUHS, Nashik
12) HOD, Academic Section - 2, MUHS, Nashik.
13) HOD, Eligibility Section, MUHS, Nashik.
14) HOD, Computer Section, MUHS, Nashik.
15) HOD, Student Welfare Section, MUHS, Nashik
16) HOD, Special Cell, MUHS, Nashik.

Dr. Sukumar J. Magdum Foundation's Housabai College of Physiotherapy
S.J.M.F / H.C.O.P.T. 2024 Nimshirgaon